पुस्तकाचे नाव - गंगालहरी

लेखकाचे नाव - जगन्नाथराय

प्रकाशक - उपलब्ध नाही

प्रकाशनवर्ष - उपलब्ध नाही

किंमत - उपलब्ध नाही

पृष्ठसंख्या - ३०

सारांश -

पुस्तकाची पहिली व शेवटची पाने फाटलेली आहेत, त्यामुळे त्याचा प्रकाशक, मुद्रक, प्रकाशनवर्ष व किंमत तसेच पूर्ण पृष्ठसंख्या कळत नाही. पहिले पान प्रस्तावनेचे आहे. कवि जगन्नाथरायांनी 'गंगालहरी ' ही गंगास्तुती लिहिण्यामागची कथा यात थोडक्यात दिलेली आहे. पुस्तकात मूळ संस्कृतातील ' गंगालहरी ' चे श्लोक व प्रत्येक श्लोकानंतर वामनपंडीतकृत प्राकृत मराठीतून त्याची टीका असे विवरण केले आहे.

## शीर्षकपानाची प्रतिकृती

डॉ. स. गं. मालशे यांजकडून
देणगी दाखल सप्रेम भेट.

( ३ )

M 8२।
दादर सार्वजनिक वाच
आगम क्रमांक व ५०
दाखल तारीख
विभाग व क्रमांक M 8

# प्रस्तावना.

पूर्वी दिल्लींत अकब्बर बादशाहा जवळ जगन्नाथराय म्हणून महापंडित होते, त्यांनीं आपल्या विद्वत्तेनें बादशाहास प्रसन्न करून त्याच्या कन्येशीं विवाह केला. पुढें कित्येक दिवसांनीं ते पश्चात्ताप पावले; परंतु त्यांस काशींतील ब्राह्मण शुद्ध करीनात; यास्तव शके १५०० सालीं श्रीगंगेच्या तटाकावर बसून त्यांनीं तिची स्तुति आरंभिली. तेव्हां दरश्लोकांस एक पायरी अशा बावन्न पायऱ्या पाणी चढून सर्वी देखतां त्यांस गंगेनें आपलें दर्शन दिलें. व यवनी सहवर्तमान त्यांचा उद्धार केला. ती ही गंगालहरी वामनकृत टीकेसहित येथें छापिली आहे..